## गडचिरोली जिल्हा




भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना

# न व्हावा रिता अमृत आहाराचा कुंभ! कुपोषण मुक्तीच्या कामात नको पडायला खंड!!



*'भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजने'त राज्य ते अंगणवाडी या सर्व पातळ्यांवर निधीची मागणी व वितरित करण्याची यंत्रणा समजून घेणे, त्यामधील अडचणी समजून घेणे. त्या अडचणी सोडवण्यासाठी काय उपाययोजना असू शकतात? यावर दस्तऐवज तयार करणे व त्यातून पुढे आलेल्या शिफारशी राज्य पातळीवरील अधिकारी व अंगणवाडी युनियन्स यांच्यासोबत मांडण्याच्या उद्देशाने या योजनेचा सखोल अभ्यास रायगड, ठाणे, आणि गडचिरोली या तीन जिल्ह्यांमध्ये करण्यात आला. तसेच गाव पातळीवर ही योजना राबवत असताना या योजनेबद्दल लाभार्थ्यांचे व अंगणवाडी सेविकांचे काय मुद्दे आहेत, ते मुद्दे सोडवण्यासाठी काय उपाययोजना करायला हव्यात या उद्देशाने वरील तीन जिल्ह्यांतील तीन तालुक्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर या योजनेचे सामाजिक अंकेक्षण (सोशल ऑडिट) करण्यात आले.*



# भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेची पार्श्वभूमी

अनुसूचित क्षेत्रातील आहारातील उष्मांक व प्रथिनांच्या कमतरतेमुळे कमी वजनाची बालके जन्माला येण्याचे प्रमाण जास्त असून आदिवासी समाजामध्ये याचे प्रमाण ३३.१ टक्के एवढे आहे. आदिवासी स्त्रियांमध्ये गरोदरपणाच्या शेवटच्या तिमाहीमध्ये वजन वाढीचे प्रमाण कमी असल्यामुळे त्याचा परिणाम बाळाच्या वजनावर होऊन कमी वजनाची बालके जन्माला येतात, असे अनेक अभ्यास व संशोधनातून सिद्ध झाले आहे. तसेच बालक जन्मानंतर पहिले सहा महिने पूर्णपणे आईवर अवलंबून असल्यामुळे या कालावधीत मातेचे आरोग्य व पोषण चांगले राहणे आवश्यक असते. अपुरा आहार व गरोदरपणात घ्यावयाची काळजी याबाबत आदिवासी समाजामध्ये फारशी जागरूकता दिसून येत नाही. **या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्रात अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तन्यदा मातांना अतिरिक्त पूरक चौरस आहार देण्याबाबत मा. राज्यपाल यांच्या आदेशाने दिनांक १ डिसेंबर, २०१५ पासून शासनातर्फे आदिवासी भागात १६ जिल्ह्यातील ८५ एकात्मिक बाल विकास प्रकल्पाअंतर्गत भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना राबवली जात आहे.**

तसेच अपुऱ्या उष्मांक व प्रथिनांमुळे आदिवासी भागातील बालकांच्या वाढीवर वाईट परिणाम होऊ नये, त्यांच्यामध्ये रक्तपांढरी, वाढ खुरटणे (स्टटिंग), उंचीच्या प्रमाणात कमी वजन (वेस्टिंग), कमी वजन (अंडरवेट) असे प्रकार होऊन ही बालके कुपोषित होऊ नयेत म्हणून **दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ या जागतिक आदिवासी दिनापासून आदिवासी भागातील ६ वर्षापर्यंतच्या बालकांचे कुपोषण कमी करण्यासाठी या योजनेचा दुसरा टप्पा राबविण्यात येत आहे.**

अमृत आहार योजना आदिवासी विकास विभागाचा एक महत्त्वाकांक्षी कार्यक्रम असून आदिवासी विभागाने उचललेले हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. गरोदर स्त्रिया व स्तन्यदा मातांना पाकीटबंद आहार (टीएचआर) बंद करून शिजवलेला ताजा चौरस आहार आठवड्यातून ५ दिवस देणे आणि ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ दिवस अंडी किंवा केळी देणे हे या योजनेचे खास वैशिष्ट्य आहे. **त्यामुळे आदिवासी समाजातील स्त्रियांना व बालकांना या योजनेचा व्यवस्थित लाभ मिळावा व ही योजना अधिक चांगल्या पद्धतीने कार्यान्वित व्हावी म्हणून ग्रामसभा व विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून या योजनेचे सामाजिक लेखा परीक्षण करण्याचेही निर्देश या शासन निर्णयातून देण्यात आले आहेत.**

तसेच अमृत आहार योजनेच्या योग्य अंमलबजावणीसाठी गाव ते राज्य अशा वेगवेगळ्या पातळ्यांवर देखरेख व मूल्यमापन यंत्रणा उभ्या करण्यात आल्या आहेत. त्रयस्थ संस्थेमार्फत नियमितपणे मूल्यमापन करणे; **जिल्हा व राज्य स्तरावर आवश्यक तरतुदींचे नियोजन करणे;** स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संस्था यांच्यामार्फत अमृत आहार योजनेवर देखरेख करण्यासाठी पुढाकार घेणे; एकात्मिक बाल विकास आयुक्त यांच्याकडून आलेल्या प्रस्तावित अंमलबजावणी कृती आराखड्यास व सुधारणेस मान्यता व मंजुरी देण्यासाठी राज्यपातळीवर प्रधान सचिव, आदिवासी विकास मंत्रालय यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे.

अंगणवाडी सेविकेमार्फत सर्व्हे केलेल्या आदिवासी भागातील सर्व गरोदर स्त्रिया व स्तन्यदा माता, ७ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालकांची यादी एकत्रित करून फायनल करणे; **जिल्हा स्तरावर आवश्यक तरतुदींबाबत आढावा घेऊन त्यानुसार जिल्हा वार्षिक आदिवासी उपाययोजना तरतुदींचे नियोजन करणे; अंगणवाड्यांमधील आहाराची तपासणी करणे;** यासाठी जिल्हा पातळीवर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा अंमलबजावणी समितीची रचना करण्यात आली आहे. तर या योजनेची अंमलबजावणी योग्य रितीने होण्यासाठी अंगणवाडी पातळीवर अनुसूचित जमातीची महिला सरपंच वा ग्राम पंचायत सदस्य, गरोदर स्त्री, स्तन्यदा माता व अंगणवाडी सेविका यांच्या समावेशाने अमृत आहार समितीची रचना करण्यात आली आहे.



# अशी झाली अमृत आहार योजनेच्या निधी मागणी आणि वितरणाची माहिती घेण्याची प्रक्रिया

अमृत आहार योजना आदिवासी विकास विभागाची असली तरी या योजनेची अंमलबजावणी एकात्मिक बाल विकास विभागामार्फत अंगणवाडीमधून केली जात आहे. या पार्श्वभूमीवर, राज्य ते अंगणवाडी पातळीवर अमृत आहार योजनेची निधी वितरणाची व मागणीची व्यवस्था काय आहे? या योजनेचे सनियंत्रण व अंमलबजावणी कशी होते? अंमलबजावणी होत असताना येणाऱ्या अडचणी, त्या सुधारण्यासाठी अंगणवाडी सेविका व स्थानिक ते राज्य स्तरावरील संबंधित अधिकाऱ्यांच्या नेमक्या सूचना काय आहेत? या दृष्टीने दस्तऐवजीकरण करणे व त्यातून पुढे आलेल्या शिफारशी राज्य पातळीवर मांडणे या उद्देशाने **रायगड, ठाणे आणि गडचिरोली** या तीन जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेचा अभ्यास करण्यात आला. रायगड जिल्ह्यातील **'दिशा केंद्र'**, ठाणे जिल्ह्यातील **'वन निकेतन संस्था'** आणि गडचिरोली जिल्ह्यातील **'आम्ही आमच्या आरोग्यासाठी'** या स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने ही निधी मागणी-वितरणाची प्रक्रिया व सामाजिक अंकेक्षणाची प्रक्रिया करण्यात आली.

## या प्रक्रियेमध्ये राज्य ते गाव पातळीवर कोणा-कोणाकडून माहिती घेण्यात आली

**जिल्हा**

- मुख्य कार्यकारी अधिकारी
- उप जिल्हा कार्यकारी अधिकारी - महिला व बाल कल्याण विभाग
- मुख्य प्रशासकीय आणि लेखा अधिकारी
- जिल्हा नियोजन अधिकारी
- जिल्हावित्त अधिकारी - महिला व बाल कल्याण विभाग
- आदिवासी विभागाचे प्रकल्प अधिकारी

**तालुका**

- गट विकास अधिकारी
- प्रकल्प अधिकारी - एकात्मिक बाल विकास विभाग
- अंगणवाडी पर्यवेक्षिका, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी
- वित्त अधिकारी- पंचायत समिती कार्यालय

**गाव**

- अंगणवाडी सेविका
- अमृत आहार समितीचे सदस्य, सरपंच

**माहिती गोळा करण्याच्या पद्धती**

- सखोल मुलाखत
- निधी संदर्भातील दस्तऐवज (बिल्स, व्हाऊचर्स, रजिस्टर्स इ.)
- सर्व्हे फॉर्म

- **वेगवेगळ्या स्तरांवरून अमृत आहार योजनेच्या निधी वितरणाची, योजनेच्या अंमलबजावणीची व सनियंत्रणाची पद्धत समजावून घेतल्यावर पुढे आलेले निष्कर्ष जिल्हा व राज्य स्तरावर मांडणे हा या प्रक्रियेचा मुख्य हेतू होता.**

# अभ्यासातून काय निष्कर्ष निघाले?

## अ. गडचिरोली जिल्ह्यातील अमृत आहार योजनेची मागणी व वितरण यंत्रणेच्या माहितीतून पुढील चित्र समोर आले.

**स्तर** — गडचिरोली जिल्ह्यात २०१६ ते २०१७ या आर्थिक वर्षात अमृत आहार योजनेचा निधी एकूण चार हप्त्यात वितरित करण्यात आला. त्याची स्थिती पुढीलप्रमाणे...

**राज्य - महिला व बाल कल्याण विभागाकडून जिल्हा उपमुख्य कार्यकारी अधिकारी**

राज्य पातळीवरून चौथा हप्ता वितरित करण्यात आला. → चौथा हप्ता

**जिल्हा नियोजन व विकास समितीकडून मुख्य प्रशासकीय व लेखा अधिकारी (कॅफो)**

पहिला हप्ता

पहिला हप्ता जुलै २०१६ मध्ये वितरित करण्यात आला.
मात्र दुसरा हप्ता मार्च २०१७ मध्ये वितरित करण्यात आला.
या दोन्ही हप्त्यांमध्ये जिल्ह्यातल्या जिल्ह्यात आठ महिन्यांचा विलंब झालेला दिसतो.
→ दुसरा हप्ता

**कॅफोकडून बिडिओ**

शासकीय जी.आर. (संदर्भ)नुसार आहार समितीला आगाऊ रक्कम देणे बंधनकारक असतानाही आगाऊ रक्कम देण्यात आली नसल्याचे दिसून आले.

कॅफोकडून बिडिओला पहिला हप्ता महिन्याभरातच वितरित करण्यात आला.

दुसरा हप्ता

कॅफोकडून बिडिओला दुसरा हप्ता सप्टेंबर २०१६ ला वितरित झाला तर तिसरा हफ्ता मार्च २०१७ मध्ये वितरित झाला. म्हणजेच निधी वितरणात कॅफो यांच्या पातळीवरून पाच महिन्याचा विलंब झालेला दिसून येतो.
→ तिसरा हप्ता

**बिडिओकडून अमृत आहार समिती**

बिडिओकडून आहार समितीला पहिला हप्ता त्याच महिन्यात वितरित करण्यात आला.

दुसरा हप्ता — तिसरा हप्ता — चौथा हप्ता

बिडिओला कॅफोकडून दुसरा हप्ता सप्टेंबर २०१६ ला वितरित झाल्यावर बिडिओकडून एक एक महिन्याच्या अंतराने आहार समितीला निधी वितरित करण्यात आला.

| महिना | एप्रिल १६ | मे १६ | जून १६ | जुलै १६ | ऑगस्ट १६ | सप्टें. १६ | ऑक्टो. १६ | नोव्हें. १६ | डिसें. १६ | जाने. १७ | फेब्रु. १७ | मार्च १७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

## आ. अमृत आहार योजनेच्या निधी आणि मागणी यंत्रणे संदर्भातील इतर मुद्यांवर पुढे आलेल्या शिफारशी

गडचिरोली जिल्ह्यात अमृत आहार योजनेच्या निधी वितरण आणि योजनेच्या सनियंत्रण आणि अंमलबजावणीबाबत जिल्हा ते गाव स्तरावरील शासकीय यंत्रणेकडून पुढील माहिती घेण्यात आली. **निधी संबंधित काय अडचणी आहेत? योजनेची देखरेख यंत्रणा कशी आहे? योजनेच्या अंमलबजावणीत काय अडचणी येतात? योजनेच्या अंमलबजावणीबाबत आपल्या काय सूचना आहेत?** याबाबत माहिती घेतली असता या माहितीच्या आधारे पुढील शिफारशी समोर आल्या. या शिफारशींची जिल्हा यंत्रणेने दखल घेऊन त्यानुसार अंमलबजावणी केल्यास निश्चितच अमृत आहार योजनेचा हेतू सफल होण्यास अधिक मदत होईल.

### गावस्तर/अंगणवाडी

| निधी संबंधित अडचणी व चांगल्या गोष्टी | देखरेख यंत्रणा संदर्भातील मुद्दे | योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीतील अडचणी |
|---|---|---|
| ▪ अंगणवाडी पातळीवर अमृत आहारासाठी आलेल्या निधीच्या खर्चाचे तपशील, मागणीपत्र, खर्चाचे व्हाऊचर्स, निधी खर्चाबाबत आहार समितीचे निर्णय आदींचे रेकॉर्ड व्यवस्थित ठेवले नसल्याचे पडियाल जोब व बोडोना गावातील अंगणवाडीत दिसून आले.<br><br>▪ पडियाल जोब गावाची अंगणवाडी सेविका अशिक्षित असल्यामुळे तिला हिशोब ठेवण्यास अडचणी येतात. त्यामुळे बऱ्याच वेळा तिला पदरचे पैसे खर्च करावे लागले असल्याचे दिसून आले.<br><br>▪ मात्र झेंडेपार गावातील अंगणवाडी सेविकेचे या आधी बचत गटामार्फत खर्चाचे हिशोब कसे ठेवायचे याबाबत प्रशिक्षण झाले असल्यामुळे अंगणवाडी सेविकेने खर्चाच्या पावत्या फाईल करून व नोंदी व्यवस्थित ठेवल्या असल्याचे निर्दशनास आले.<br><br>▪ योग्य प्रमाणात व वेळेवर पुरेसा निधी मिळत नसल्यामुळे तीनही गावातील अंगणवाडी सेविकांना योजना राबवत | ▪ अमृत आहार योजनेच्या शासकीय परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे अंगणवाडी पातळीवर ही योजना व्यवस्थित चालण्यासाठी व तिच्यावर देखरेखीच्या हेतूने अमृत आहार समिती गठीत होणे आवश्यक आहे. मात्र या तिन्ही गावात ही समिती गठीत झाल्याचे रेकॉर्डस उपलब्ध झाले नाहीत.<br><br>▪ या योजनेच्या योग्य अंमलबजावणीसाठी याबाबत या समित्यांचे कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण झाले नसल्याचे निदर्शनास आले.<br><br>▪ पर्यवेक्षिका आणि सीडीपीओ यांनी महिन्यातून किमान २० अंगणवाड्यांना भेट देऊन अमृत आहार योजनेचा आढावा घेणे व अमृत आहाराची गुणवत्ता तपासणे आदी गोष्टी करणे अपेक्षित आहेत. मात्र ते त्यांच्या नियमित भेटीतच अमृत आहार योजनेचा आढावा घेत असल्याचे आढळून आले. त्यामुळे गाव पातळीवर ही योजना राबवत असताना नक्की कोणत्या अडचणी येतात. हे कळत नाही. | ▪ अमृत आहार योजनेचा शिधा, गॅस सिलेंडर बाजाराच्या किंवा तालुक्याच्या ठिकाणाहून आणावा लागतो. तो आणण्यासाठी निधीची तरतूद केली नसल्याने हा खर्च स्वतःच्या खिशातूनच करावा लागत असल्याचे तिन्ही गावातील अंगणवाडी सेविकांनी सांगितले.<br><br>▪ अंगणवाडी सेविका व सरपंच यांच्या सहीने निधी काढावा लागत असल्याने सरपंचांना बँकेत घेऊन जाण्या-येण्याचा खर्च अंगणवाडी सेविकेला करावा लागतो. त्याचीही तरतूद केलेली नसल्याचे लक्षात आले.<br><br>▪ आहार बनवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याची कमतरता |

| निधी संबंधित अडचणी व चांगल्या गोष्टी | देखरेख यंत्रणा संदर्भातील मुद्दे | योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीतील अडचणी |
|---|---|---|
| असताना अडचणी आल्या असल्याचे दिसून आले.<br>▪ अमृत आहार समितीच्या नावे निधी येत असला व समितीच्या मान्यतेने निधी खर्च करायचा असा नियम असला तरी या समित्यांना याबद्दल कोणतीच कल्पना नसल्याचे व या समित्यांचे याबाबत तसे प्रशिक्षणही झाले नसल्याचे दिसून आले. त्यामुळे फक्त सरपंच व अंगणवाडी सेविकेच्या सहीनेच हा निधी बँकेतून काढला जातो.<br>▪ निधीच्या जमा-खर्चाचे तपशील योग्य पद्धतीने ठेवण्यासाठी अंगणवाडी सेविकांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण दिले नसल्याचे दिसून आले. तर अंगणवाडी पर्यवेक्षकांनाही याबाबत फारसी माहिती नसल्याचे आढळून आले.<br>▪ अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे मानधन वेळेत व नियमित होत नसल्याचे दिसून आले.<br>▪ अमृत आहार समितीला निधी कधी वितरित झाला याबाबत अंगणवाडी सेविकांना तालुका स्तरावरून कळविण्यात येत नसल्याचे आढळून आले. त्यामुळे आहार समितीच्या खात्यावर निधी जमा झाला असला तरी अंगणवाडी सेविकांना ते कळत नाही.<br>▪ अंगणवाडी सेविकेच्या गैरहजेरीत अमृत आहार योजना राबवली जात नाही. | ▪ तसेच शासकीय परिपत्रकानुसार आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी यांच्याही अंगणवाडीला भेटी होत नसल्याचे आढळून आले. अमृत आहार योजनेचे हिशोब आहार समितीने ग्रामसभेत मांडणे आवश्यक आहे. मात्र आहार समितीला व ग्रामसभेला याबाबत त्यांचे अधिकार व जबाबदाऱ्या माहीत नसल्याचे तिन्ही गावातून आढळून आले. | असल्याचे अंगणवाडी सेविकांनी सांगितले.<br>▪ अमृत आहार योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये या योजनेबद्दल जागरूकता आढळून आली नाही. तसेच दूर अंतरावर असलेले लाभार्थी या योजनेपासून वंचित राहत असल्याचे बोडेना गावात आढळून आले. |

## तालुका स्तर

| निधी संबंधित अडचणी व चांगल्या गोष्टी | देखरेख यंत्रणा संदर्भातील मुद्दे |
|---|---|
| ▪ जिल्हा स्तरावरून वेळेत व नियमित निधी वितरणात अडचणी दिसून आल्या.<br>▪ निधी हप्त्या-हप्त्याने न येता एकाच वेळी मिळाला तर अमृत आहार समित्यांनाही वर्षभराचा निधी एकाच वेळी वितरित करता येईल. त्यामुळे योजना राबवताना निधीची कमतरता भासणार नाही.<br>▪ तालुका पातळीवरून अमृत आहार समितींना निधी ट्रान्सफर करताना बँकेच्या पातळीवर अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे दिसून आले. संपूर्ण तालुक्यातील अमृत आहार समितींना निधी ट्रान्सफर करण्यासाठी त्या | ▪ तालुका पातळीवर अंगणवाडी सेविकांच्या मासिक बैठकांमध्ये या योजनेचा आढावा व मागणी पत्र घेतले जाते.<br>▪ तालुका पातळीवर एकात्मिक बाल विकास विभाग व आदिवासी विकास विभाग या |

| निधी संबंधित अडचणी व चांगल्या गोष्टी | देखरेख यंत्रणा संदर्भातील मुद्दे |
|---|---|
| समित्यांची RTGS साठी यादी बनविणे व मग ते ट्रान्सफर करणे हे काम वेळखाऊ असल्याने ही प्रक्रिया करण्यात किमान दोन ते तीन महिन्याचा कालावधी लागत असल्याने अमृत आहार समित्यांना निधी वेळेत मिळण्यास अडचण येत असल्याचे दिसून आले. तसेच जिल्हा स्तरावरून सहकारी बँकेत निधी जमा होत असल्यामुळेही निधी वेळेत मिळण्याच्या प्रक्रियेत अडचणी निर्माण होत असल्याचे तालुका पातळीवरील अधिकाऱ्यांनी सांगितले. तसेच सरकारी बँकांच्या कर्मचाऱ्यांना RTGS पद्धतीने निधी ट्रान्सफर करण्याचे रितसर प्रशिक्षण नसल्यानेही या अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले. | दोन विभागांमध्ये समन्वयाचा अभाव दिसून आला.<br>▪ या योजनेची देखरेख ग्रामसभांच्या पातळींवर व्यवस्थित व्हावी म्हणून सीडीपीओंनी तालुका पातळीवर सरपंचाची बैठक घेतली. |

## जिल्हा स्तर

| निधी संबंधित अडचणी व चांगल्या गोष्टी | देखरेख यंत्रणा संदर्भातील मुद्दे |
|---|---|
| ▪ गडचिरोली राज्य पातळीवरून निधी मिळण्यात अनियमितता आढळून आली.<br>▪ २०१८-१९ या आर्थिक वर्षात एकात्मिक बाल विकास विभागाकडून जिल्हा नियोजन व विकास समितीच्या वार्षिक आराखड्यात अमृत आहार योजनेचा निधी मागणी करण्यास विसरल्यामुळे राज्य पातळीवरून निधी मिळू शकला नाही. त्यामुळे जिल्हा अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिकार क्षेत्रातील निधी अमृत आहार योजनेसाठी वापरून निधीची कमतरता पडू दिली नाही.<br>▪ **आर्थिक वर्ष २०१९-२० या काळात जिल्हा नियोजन व विकास समितीकडून एकात्मिक बाल विकास विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निधी वितरित करण्यात आला. निधी थेट अमृत आहार समितीला वितरित केल्यामुळे या वर्षात निधी वितरणात अनियमितता व वेळखाऊपणा झाला नसल्याचे दिसून आले. जिल्हा पातळीवरून अमृत आहार समिताला निधी वितरण करण्याची ही पद्धत योग्य असल्याचे गाव ते जिल्हा पातळीवरील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मांडले.**<br>▪ अमृत आहार योजनेच्या निधी वापरात गैरव्यवहार होऊ नयेत म्हणून एका वेळी फक्त पाच हजार रुपयेच काढता येतील असे आदेशपत्र जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत गडचिरोली जिल्ह्यासाठी काढण्यात आले.<br>▪ या योजनेच्या अंमलबजावणीत ग्रामसभांचा सहभाग वाढविण्यासाठी जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढाकार घेऊन त्यांच्यामार्फत तसे पत्र काढण्यात आले. जेणेकरून आहार समिताला निधी वेळेत व नियमित स्वरूपात न मिळाल्यास ग्रामसभा पेसा निधीतून थोडीफार मदत करू शकतील. परंतु असे असले तरी ग्रामसभांचा सहभाग यात फारसा दिसून येत नाही. | ▪ जिल्हा स्तरावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत सीडीपीओंसोबत नियमित स्वरूपात अमृत आहार योजनेची आढावा बैठक घेतली जात असल्याचे दिसून आले.<br>▪ जिल्हा पातळीवर शासकीय निर्णयानुसार जिल्हा सनियंत्रण व अंमलबजावणी समितीची स्थापना झाली असली तरी या समितीमार्फत योजनेवर व्यवस्थित देखरेख होत नसल्याचे दिसून आले. |

## योजनेच्या योग्य अंमलबजावणीसाठी आलेल्या सूचना

### रिक्त पदे भरणे.

अंगणवाडी सेविकेचे पद तातडीने भरण्यात यावे; सीडीपीओंकडे कुरखेडा व कोरची या दोन तालुक्यांचा पदभार असल्याने त्यांना अमृत आहार योजनेची देखरेख करण्यासाठी कार्यक्षेत्रात भेटी देता येत नाही. तसेच १३० गावे असलेल्या कोरची तालुक्यात फक्त चारच अंगणवाडी पर्यवेक्षिका पर्यवेक्षणाचे काम करतात. तरी सीडीपीओ, पर्यवेक्षिका यांची पदे तातडीने भरण्यात यावी.

### सक्षम देखरेख आणि समन्वय यंत्रणेची आवश्यकता असणे.

एकात्मिक बाल विकास विभाग व आदिवासी विकास विभाग यांच्यात समन्वय वाढल्यास येणाऱ्या अडचणी कमी होऊन योजना अधिक सफल होण्यास मदत होईल; उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पातळीवर नियमितपणे दर तीन महिन्याला अमृत आहार समितींना निधी वितरित झाला तर गाव पातळीवर योजना सुरळीत चालण्यास मदत होईल; अंगणवाडी पर्यवेक्षकांनी तालुका पातळीवर आढावा न घेता त्यासोबत प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात जाऊन या योजनेची देखरेख करणे, आढावा घेणे आवश्यक आहे; अमृत आहार समितीमार्फत गाव पातळीवर या योजनेची देखरेख न करता गाव आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व पोषण समितीमार्फत या योजनेची देखरेख केल्यास योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होण्यास मदत होईल. यामुळे या समितीच्या मदतीने गाव पातळीवर योजनेच्या अंमलबजावणीत येणाऱ्या त्रुटी व अडथळे ग्रामसभेमार्फत दूर करण्यास मदत होईल; सीडीपीओ व अंगणवाडी पर्यवेक्षकांसोबत या योजनेचा आढावा घेण्यासाठी व योजनेच्या अंमलबजावणीतील अडथळे दूर करण्यासाठी जिल्हा स्तरावर नियमित बैठका घेण्यात याव्यात; तालुका पातळीवर एकात्मिक बाल विकास विभाग व आदिवासी विकास विभाग या दोन विभागांमध्ये समन्वयासाठी नियमित बैठका व दोघांच्या मिळून कार्यक्षेत्रात भेटी होणे आवश्यक आहे. त्यासाठी विशेष प्रयत्न व्हावेत; गाभा समिती व नव संजीवनी समितीच्या बैठकीतच अमृत आहार योजनेचा आढावा न घेता जिल्हा सनियंत्रण व अंमलबजावणी समितीच्या नियमित व विशेष बैठका घेऊनच योजनेचा आढावा घेण्यात यावा; या योजनेच्या फलनिष्पत्तीसाठी ग्रामसभांची सहभागिता वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावे.

### निधी मागणी, वितरण आणि नियोजन योग्य पद्धतीने करण्यावर भर देणे.

प्रती व्यक्ती ३५ रुपयात आहार देणे परवडत नसल्याने या रकमेत वाढ करून कमीत कमी ही रक्कम ५० रुपये/प्रती व्यक्ती इतकी करण्यात यावी; आर्थिक वर्षात राज्य पातळीवरून जिल्हा पातळीवर १०० टक्के निधी सुरुवातीलाच वितरित केला तर निधी वितरणातील विलंब व योजनेच्या अंमलबजावणीतील अडचणी कमी होतील; ज्यांच्या जीवावर या योजनेची अंमलबजावणी होते, त्या



अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे मानधन दरमहा देण्यात यावे; निधी वितरणातील विलंब टाळण्यासाठी कॅफोमार्फत निधी वितरणाची पद्धत बंद करून उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून थेट आहार समितीच्या खात्यावर निधी वर्ग करण्यात यावा; सीडीपीओ यांच्या पातळीवर पुरेसा शिल्लक निधी उपलब्ध राहिल्यास ज्या आहार समितीला निधीची आवश्यकता आहे त्यांना लगेच सदर निधी वर्ग करता येईल. जेणेकरून गाव पातळीवर योजना नियमित स्वरूपात चालू राहील;

### अंगणवाडी सेविकांना नियमित आणि सततचे प्रशिक्षण देणे.

- योजनेच्या अंमलबजावणीसाठी व निधीचा हिशोब चोख ठेवण्यासाठी अंगणवाडी सेविकांचे नियमितपणे प्रशिक्षण करत राहणे आवश्यक आहे; अमृत आहार बनविण्यासाठी अंगणवाडी सेविका व मदतनीसवर ताण पडतो. त्यामुळे त्या त्यांची इतर नियमित कामे नीट करू शकत नाही. त्यांच्यावरील हा ताण कमी व्हावा म्हणून शासकीय परिपत्रकानुसार ग्रामसभांनी महिला स्वयंपाकीची नेमणूक करावी किंवा आहार शिजविण्याचे काम महिला बचत गटांना देण्यात यावे.
- वर दिलेल्या मुद्यांवर पुढे जाऊन काम होणे गरजेचे आहेच. या सगळ्यातून एक गोष्ट गडचिरोलीमध्ये लक्षात आली की, वर दिलेल्या मुद्यांमध्ये वेळेवर निधी मिळणे हा खूप कळीचा मुद्दा आणि सर्वात महत्त्वाची कडी आहे. आणि हाच मुद्दा लक्षात घेऊन गडचिरोलीमध्ये काही प्रयत्न करण्यात आले. ज्यामध्ये जिल्हाधिकारी यांनी खूप मोठी भूमिका बजावली असून त्यांनी पुढाकार घेऊन अमृत आहार योजनेच्या निधीची जिल्हा पातळीवरील वितरण यंत्रणेमध्ये बदल करून आणखीन सुटसुटीत केली.

### जिल्हाधिकारी यांनी केलेल्या सकारात्मक गोष्टी

- **आर्थिक वर्ष २०१९-२० या काळात जिल्हा नियोजन व विकास समितीकडून एकात्मिक बाल विकास विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना निधी वितरित करण्यात आला. निधी थेट अमृत आहार समितीला वितरित केल्यामुळे या वर्षात निधी वितरणात अनियमितता व वेळखाऊपणा झाला नसल्याचे दिसून आले. निधी वितरण करण्याची ही पद्धत योग्य असल्याचे गाव ते जिल्हा पातळीवरील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मांडले.**
- तालुका पातळीवर अंगणवाडी सेविकांच्या मासिक बैठकांमध्ये या योजनेचा आढावा व मागणी पत्र नियमितपणे घेतले जात आहे. जिल्हाधिकारी, जिल्हा स्तरावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत सीडीपीओंसोबत नियमित स्वरूपात अमृत आहार योजनेची आढावा बैठक घेतली जात असल्याचे दिसून आले. त्यामध्ये झालेल्या खर्चाचा आढावा; पुढील नियोजन आणि अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी सोडवण्याचा सतत प्रयत्न केला जातो. जिल्हाधिकारी स्वतः आढावा घेत असल्याने तालुका आणि जिल्हा पातळीवरील संबंधित अधिकारी-कर्मचारी देखील सतर्क राहून काम करत आहेत.





# असे केले अमृत आहार योजनेचे सामाजिक अंकेक्षण (सोशल ऑडिट)

**अमृत आहार योजना राबवत असताना ग्रामसभा व विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून या योजनेचे सामाजिक लेखा परीक्षण करण्याचे निर्देश या योजनेच्या शासन निर्णयात देण्यात आले आहे.** या निर्देशाचा आधार घेत गाव पातळीवर या योजनेची सद्यःस्थिती काय आहे? योजनेत ठरवल्याप्रमाणे आहार दिला जातो का? निधी वेळेवर मिळतो का? योजना राबवताना अंगणवाडी सेविकांना काय अडचणी येतात? प्रत्यक्ष लाभार्थ्याला या योजनेचा लाभ कसा मिळतो? हे तपासण्याच्या दृष्टीने महाराष्ट्रातील **रायगड, ठाणे** आणि **गडचिरोली** या तीनही जिल्ह्यातील अनुक्रमे **कर्जत, मुरबाड** आणि **कोरची** या तीन तालुक्यातील प्रत्येकी ३ गावांमध्ये सामाजिक अंकेक्षण करण्यात आले.

## कोणी केले अमृत आहार योजनेचे सोशल ऑडिट?

- गडचिरोली जिल्ह्यातील कोरची तालुक्यात सक्रिय असलेल्या **'ग्रामसभेची महाग्रामसभा'**मार्फत सोशल ऑडिटची प्रक्रिया करण्यात आली. आजवर फक्त वन हक्क आणि वनोपजावर काम करणाऱ्या कोरची महाग्रामसभेने, पेसा कायद्याअंतर्गत ग्रामसभांनी शासकीय योजनांचे सोशल ऑडिट करण्याच्या अधिकाराचा वापर करून **अमृत आहार योजनेचे सोशल ऑडिट** करण्यासाठी पुढाकार घेतला.

**गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज उपविभागातील ४२,००० लोकसंख्या असलेल्या कोरची तालुक्यात एकूण १५० मुख्य अंगणवाड्या तर ५० मिनी अंगणवाड्या आहेत. संपूर्ण कोरची तालुक्यात अमृत आहार योजना राबवली जाते. सामाजिक अंकेक्षणासाठी पडियाल जोब, बोडोना आणि झेंडेपार या गावांची निवड करण्यात आली. या तीनही गावातून गावसभा घेत अमृत आहार योजनेविषयी जाणीव जागृती व सोशल ऑडिटचे महत्त्व गावकऱ्यांना पटवून देण्यात आले. गावात ग्रामसभा घेऊन सोशल ऑडिट करण्यासाठी ग्रामसभांचे ठराव घेण्यात आले.**



- कोरची तालुक्यातील १३० गावांपैकी ९० गावे या महाग्रामसभेचे सदस्य आहेत. या गावांपैकी महाग्रामसभेने पडियाल जोब, बोडोना आणि झेंडेपार या गावांची प्रायोगिक तत्त्वावर अमृत आहार योजनेचे सोशल ऑडिट करण्यासाठी निवड केली.
- महाग्रामसभेने या तीन गावातील ग्रामसभेचे सभासद असलेल्या तरुण युवक-युवतींना घेऊन गाव गटाची बांधणी केली. या गाव गटात किमान दहा सदस्य घेण्यात आले.
- महाग्रामसभेचे तालुक्याचे व गावातील ज्येष्ठ पदाधिकारी आणि 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' संस्थेच्या कार्यकर्त्यांनी या सोशल ऑडिट गटाचे मार्गदर्शक म्हणून भूमिका पार पडली.

## « सोशल ऑडिट प्रक्रिया करण्यासाठी गटाचे प्रशिक्षण

**या तिन्ही गावातील गटांना एकत्र करून अमृत आहार योजनेचे सोशल ऑडिट कसे व का करायचे? याबाबत दोन दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणात पुढील गोष्टींवर भर देण्यात आला-**

- अमृत आहार योजना नक्की काय आहे? योजनेचा हेतू काय आहे? या योजनेचे लाभार्थी कोण आहेत? या योजनेत काय तरतुदी आहेत? योजनेची अंमलबजावणी करण्यासाठीची जबाबदार यंत्रणा काय आहे?
- अमृत आहार योजनेच्या शासकीय माहितीचे संकलन कसे व कोणाकडून करायचे? योजनेची जाणीवजागृती कशी करायची?
- शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून गावगटाला जी माहिती घ्यायची आहे, त्या माहितीचे स्वरूप कोणत्या प्रकारचे असेल? त्याचे फॉरमॅट समजून सांगणे.
- मिळालेल्या माहितीची पडताळणी कोणी व कशी करायची? पडताळणीचा हेतू काय?
- पडताळणीतून पुढे आलेल्या मुद्द्यांच्या निराकरणासाठी जनसंवादाचे आयोजन आणि पाठपुरावा कसा करायचा?
- निवडलेल्या गावांमध्ये प्रत्यक्ष सोशल ऑडिट घडवून आणण्यासाठीचे नियोजन करणे.

## « असे केले अमृत आहार योजनेच्या माहितीचे संकलन व जाणीवजागृती

- कोरची तालुक्यात गोंडी ही आदिवासी बोली भाषा बोलली जाते. लोकांना त्यांच्या भाषेत व सोप्या पद्धतीने अमृत आहार योजनेची माहिती कळावी. आणि त्या माहितीच्या आधारे त्यांनी सोशल ऑडिटच्या प्रक्रियेत सहभागी व्हावे. या दृष्टीने गोंडी भाषेत पोस्टर बनवून या तिन्ही गावात ग्रामसभेमार्फत गावसभा घेऊन लोकांमध्ये जाणीवजागृती करण्यात आली.



- अमृत आहार योजनेची तपशीलवार माहिती घेण्यासाठी फॉरमॅट तयार करून गावगटांना देण्यात आले. या फॉरमॅटच्या आधारे ग्रामसभेच्या ठरावानुसार गाव पातळीवर अंगणवाडी सेविकांकडून माहिती संकलित करण्यात आली. कोणतेही आढेवेढे न घेता अंगणवाडी सेविकांनी माहिती तर दिलीच शिवाय माहिती घेते वेळी त्यांना निदर्शनास आणून दिलेल्या त्रुटी दुरुस्त करण्याची जबाबदारीही त्यांनी घेतली.

- **अमृत आहार योजनेच्या लाभार्थ्यांचे रजिस्टर, जमा-खर्चाच्या नोंदी, बँकेचे पासबुक, मागणी पत्र, लाभार्थी हजेरीपट, अमृत आहार समितीच्या बैठकीचे इतिवृत्त, आहार रजिस्टर व लाभार्थ्यांची यादी झेरॉक्स करून घेण्यात आली.**

- झेरॉक्सचा खर्च, पडताळणी दरम्यान गाव बैठकीतील चहा-पाणी व नाश्त्याचा खर्च त्या त्या गावातील ग्रामस्थांनी केला.

- **मे, ऑक्टोबर आणि डिसेंबर २०१९ या तीन महिन्यातील अमृत आहार योजनेचा लाभ घेतलेल्या गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांची यादी, तर ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील मुलांच्या रजिस्टरची झेरॉक्स घेण्यात आली. माहितीच्या सत्यतेसाठी त्यावर अंगणवाडी सेविकेची सही व शिक्का घेण्यात आला.**

- **एप्रिल ते डिसेंबर २०१९ या कालावधीतील अंगणवाडीमधील अमृत आहार समितीच्या बैठकीचा अहवाल, अमृत आहार समिती तपासणी नोंदवहीतील टिपण यांचीही पडताळणीसाठी झेरॉक्स घेण्यात आली.**

- महाग्रामसभेचे सदस्य, गावगट व संस्थेचे कार्यकर्ते यांनी सर्वप्रथम संकलित केलेली माहिती आधी स्वतः समजून घेतली. त्यातून पुढे आलेले मुद्दे नोंदवून घेतले. त्यानंतर गावात बैठक घेऊन पडताळणीचे नियोजन केले.

## अशी केली पडताळणी

- सामाजिक अंकेक्षणाचा पुढचा आणि महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजे मिळालेल्या माहितीची पडताळणी करणे. ही पडताळणी निरपेक्षपणे व्हावी म्हणून महाग्रामसभेचे सदस्य, गावगट व संस्थेचे कार्यकर्ते यांनी सर्व प्रथम संकलित केलेली माहिती आधी स्वतः समजून घेतली. त्यातून पुढे आलेले मुद्दे नोंदवून घेतले. त्यानंतर गावात गावसभा घेऊन पडताळणीचे नियोजन केले.

- पडियाल जोब, बोडेना आणि झेंडेपार या तीनही गावगटातील सदस्य या तीनही गावात जाऊन पडताळणी करतील आणि त्या त्या ग्रामसभेने या गावगटांना सहकार्य करण्याचा ठराव तिन्ही गावांमधून घेण्यात आला.

- त्यानुसार लाभार्थ्यांच्या यादीप्रमाणे गरोदर स्त्रिया व स्तन्यदा मातांच्या (लाभार्थ्यांच्या) घरी जाऊन, अंगणवाडी सेविकेने सांगितलेली माहिती गाव गटाने पडताळून पाहिली.

- अमृत आहाराची गुणवत्ता कशी असते? आहाराचा दर्जा





कसा असतो? शासकीय परिपत्रकात ठरवून दिल्यानुसार आहार नियमित स्वरूपात मिळतो का? (हिरवी भाजी, पोळी/भाकरी, डाळ-भात, अंडी किंवा केळी, शेंगदाणा लाडू, लिंबाची फोड), आहाराविषयी काही तक्रारी आहेत का? अंगणवाडी सेविकेला आहार देताना काय अडचणी येतात? अंगणवाडीला येणाऱ्या अडचणी / निधीबद्दल गावात किंवा ग्रामसभेत चर्चा केली जाते का? अमृत आहार योजनेअंतर्गत अंगणवाडीमध्ये आहार समितीच्या बैठका नियमित होतात का? आदी माहितीची पडताळणी गरोदर स्त्री व स्तन्यदा मातांशी बोलून करण्यात आली.

- सोबतच ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांच्या पालकांची बैठक घेऊन बालकांना आठवड्यातून किती दिवस अंडी/ केळी दिली जातात? याची पडताळणी केली.
- निधीचा अभाव, निधी वेळेत न मिळणे यामुळे अमृत आहार देण्यावर काही परिणाम होतोय का? याची माहिती घेण्यासाठी अंगणवाडी सेविका, अमृत आहार समिती सदस्य यांच्याही मुलाखती पडताळणीच्या वेळी घेतल्या.
- अंगणवाडीत प्रत्यक्ष जाऊन अमृत आहार बनविण्याची जागा, शिधा ठेवण्याची जागा, आहार बनविण्याची पद्धत याची तपासणी केली.
- पडताळणीच्या शेवटी अंगणवाडीतून मिळालेली अमृत आहार योजनेची शासकीय माहिती, पडताळणीतून दिसून आलेल्या तफावती, लाभार्थ्यांनी सांगितलेल्या अडचणी, अंगणवाडी सेविकेने मांडलेल्या अडचणी, नव्याने समोर आलेले मुद्दे यांची नोंद गाव गटाने करून ठेवली.
- वरवर पाहता सुरळीत चाललेल्या अमृत आहार योजनांच्या अंतरंगात किती समस्या आहेत हे पडताळणीच्या प्रक्रियेतून प्रकर्षाने पुढे आले.

## गाव जनसुनवाई

- अमृत आहार योजनेच्या माहितीची प्रत्यक्ष लाभार्थ्यांना भेटून पडताळणी झाल्यावर पडताळणीतून पुढे आलेले मुद्दे सोडविण्यासाठी या तीनही गावात ग्रामसभेमार्फत जनसंवाद आयोजित करण्यात आला.
- या जनसंवादात संबंधित सरकारी अधिकारी उपस्थित राहतील यासाठी पाठपुरावा करण्यात आला. प्रत्यक्ष जनसंवादाच्या वेळी सादर करायची माहिती व अहवाल तयार करण्यात आले.
- गावातील समस्या व त्याविषयीच्या मागण्या यांचा माहितीफलक कार्यक्रमाच्या ठिकाणी लावण्यात आला.
- अमृत आहार योजनेची माहिती देऊन पडताळणीतून उपस्थित झालेले मुद्दे या जनसंवादात चर्चिले गेले. जे मुद्दे गाव पातळीवर सुटणारे होते त्यावर महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. तर धोरणात्मक निर्णयांसाठी तालुका व जिल्हा पातळीवर सबंधित अधिकाऱ्यांसोबत चर्चा करण्याचे ठरले.



## सोशल ऑडिटच्या पडताळणीतून पुढे आलेले सकारात्मक मुद्दे

- पडियाल जोब, बोडेना आणि झेंडेपार या तिन्ही गावात अमृत आहाराची गुणवत्ता चांगली असून आहार शासकीय परिपत्रकात ठरवून दिलेल्या प्रमाणात व अपेक्षेप्रमाणे मिळतो. मात्र ज्या स्त्रिया किंवा बालके अंडी खात नाही त्यांना केळी दिली जातात.
- तिन्ही गावात गरोदर स्त्रिया व स्तन्यदा मातांना महिन्यातून २५ दिवस तर ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना १६ दिवस अंडी नियमित मिळतात.
- बोडेना गावात मुलांनी अंगणवाडीत जर अंडी खाल्ली नाहीत तर अंडी त्यांच्या डब्यात घालून घरी खाण्यासाठी दिली जातात. तसेच काही गरोदर स्त्रिया व स्तन्यदा माता अंगणवाडीत येऊन आहार खात नाही त्यामुळे त्यांना घरपोच आहार दिला जातो.

## गाव पातळीवरील पडताळणीतून पुढे आलेल्या समस्या

- तिन्ही गावात **अमृत आहार समिती गठीत झाली असल्याचा ठराव उपलब्ध नसून समितीचे रजिस्टर, आहार तपासणी रजिस्टर व चव रजिस्टर उपलब्ध नाही.** आहार समिती सक्रिय नसल्यामुळे समितीच्या बैठका होत नाहीत. अमृत आहाराबद्दलच्या **नोंदी व्यवस्थित होत नसल्याचे** आढळून आले.
- नाचणीची भाकरी स्थानिक आहारात वापरत असल्यामुळे अमृत आहारात जर नाचणीची (मंड्या) भाकरी/आंबील व हातसडीच्या तांदळाचा भात देण्यात यावा अशी मागणी पडियाल जोब गावातील गरोदर व स्तन्यदा मातांकडून आली आहे.
- पडियाल जोब गावातील मिनी अंगणवाडीत मदतनीसलाच अंगणवाडी सेविकेचे काम करावे लागते. तिच्यावर अमृत आहार शिजविण्याचा कामाचा अतिरिक्त भार पडतो तरी ग्रामसभेमार्फत महिला स्वयंपाकीची नेमणूक करण्यात यावी.
- अशिक्षित मदतनीस ऐवजी शिक्षित अंगणवाडी सेविका नेमण्यात यावी व अंगणवाडीसाठी स्वतंत्र इमारत देण्यात यावी. अशी पडियाल जोब ग्रामसभेने तालुका पातळीवर मागणी केली आहे.
- तिन्ही गावात अमृत आहार समितीबद्दल फारशी माहिती नसल्यामुळे ग्रामसभेत या समितीबद्दल कधी चर्चा झाली नाही. आहार समितीचे हिशोब तपासले गेले नाहीत.
- बोडेना गावातील अंगणवाडीत आहार रजिस्टर्स नसल्यामुळे लाभार्थ्यांच्या सह्या घेतल्या जात नाहीत. तर गावातील इतर पाड्यातील काही गरोदर स्त्रिया व स्तन्यदा माता आहार घेण्यासाठी अंगणवाडीत नियमित येत नाहीत.

## पडताळणीतून आलेल्या मुद्यांबद्दल गाव जनसंवादात झालेले निर्णय

- तिन्ही गावात ग्रामसभेमार्फत अमृत आहार समिती स्थापन झाल्याचा ठराव करून घेणे. आहार समितीच्या नियमित बैठका घेणे.
- तिन्ही गावातील अंगणवाडीत अमृत आहार समितीचे रजिस्टर व चव रजिस्टर तयार करणे. आहार समितीने वेळोवेळी आहाराची गुणवत्ता व चव तपासणे.
- पडियाल जोब गावातील अंगणवाडीला स्वतंत्र इमारत बांधण्यासाठी ग्रामसभेचा ठराव घेऊन आदिवासी विकास विभाग व एकात्मिक बाल विकास विभागाला सदर ठराव सादर करणे.
- सर्व गरोदर स्त्रिया व स्तन्यदा मातांनी अंगणवाडीत येऊनच आहार खावा यासाठी बोडेना गावाच्या ग्रामसभेत निर्णय घेण्यात आला. या महिला एकत्र आल्यास त्यांना गरोदरपणातील काळजी, बाळाची काळजी, स्तन्यपान, चौरस आहाराचे महत्त्व आदी गोष्टींबद्दल समुपदेशन व मार्गदर्शन करता येईल.
- कुपोषित मुलांसाठी असलेल्या EDNFच्या पाकिटांचा स्टॉक संपवायचा असल्याने आय.सी.डी.एस.मार्फत कोरची तालुक्यातील सर्व गावातील साधारण श्रेणीतील बालकांना ही पाकिटे देत असल्याचे बोडेना गाव गट सदस्यांच्या निदर्शनास आले. गाव गटाने ही गोष्ट तालुका बाल विकास अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली असता त्यांनी ती पाकिटे न देण्याचे निर्देश अंगणवाडी सेविकांना दिलेत.
- **कोरची महाग्रामसभेमार्फत तालुका पातळीवर जनसंवाद आयोजित करून त्यात पुढील मुद्यांवर तालुका व जिल्हा पातळीवरील अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून निर्णय घेण्यात येतील-**
  - अमृत आहारात शासकीय परिपत्रकानुसार जास्तीत जास्त प्रमाणात स्थानिक आहाराचा समावेश करणे.
  - गाव आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती मार्फत अमृत आहार योजनेवर देखरेख ठेवणे.



**अमृत आहार योजनेचे सोशल ऑडिट करत असताना अमृत आहाराव्यतिरिक्त कोरची ग्रामीण रुग्णालयातील गैरसोयींबाबत गरोदर स्त्रियांनी व स्तन्यदा मातांनी तक्रारी मांडल्या. ह्या तक्रारी गाव जनसंवादात चर्चिल्या गेल्या. या तक्रारींचा लवकरात लवकर निपटारा व्हावा म्हणून तालुक्यातील सर्व ग्रामसभांच्या मागण्यांचे निवेदन महाग्रामसभेमार्फत तालुका व जिल्हा पातळीवरील अधिकाऱ्यांना देण्याचे ठरले.**

- कोरची ग्रामीण रुग्णालयात सोनोग्राफीची सुविधा नसल्यामुळे गरोदर स्त्रियांना सोनोग्राफीसाठी आरमोरी किंवा ब्रह्मपुरीला ७० ते ८० किलोमीटर दूर जावे लागते. परिणामी बऱ्याच महिला पैशाच्या अभावी इतक्या दूर सोनोग्राफी करण्यासाठी जाऊ शकत नाही. आरोग्य विभागामार्फत यासाठी पर्यायी उपाययोजना उपलब्ध नसून कोरची ग्रामीण रुग्णालयातच तातडीने सोनोग्राफीची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी.
- संदर्भ सेवेची सुविधा वेळेवर उपलब्ध होत नसल्यामुळे गरोदर स्त्रियांची जोखीम अधिक वाढत असल्याने संदर्भ सेवा नियमित व सुरळीत करून सेवेवर देखरेखीची यंत्रणा विकसित करण्यात यावी.
- कोरची ग्रामीण रुग्णालयात बाल रोग व स्त्री रोग तज्ज्ञ नसल्यामुळे स्त्रिया व बालकांना न परवडणाऱ्या महागड्या खासगी आरोग्य सेवेचा आश्रय घ्यावा लागतो. आरोग्य विभागामार्फत स्त्री रोग व बाल रोग तज्ज्ञांची रिक्त पदे भरल्यास आवश्यक उपचारा अभावी या रुग्णांना आरोग्याच्या दूरगामी परिणामांना सामोरे जावे लागणार नाही.
- आरोग्य विभागामार्फत वरील मागण्यांवर तातडीने कार्यवाही झाली तर अमृत आहार योजनेत अपेक्षित असलेले निर्देशक पूर्ण होण्यास नक्कीच हातभार लागेल.



साथी
Support for Advocacy & Training to Health Initiatives

- प्रकाशक : साथी
  फ्लॅट नं. ३ व ४, अमन ई टेरेस सोसायटी,
  डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०३८
- फोन : ०२०-२५४७२३२५/२५४७३५६५
- ई-मेल : sathicehat@gmail.com
- वेबसाईट : www.sathicehat.org
- प्रकाशन : जून २०२०